शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०१७५/२०२३ मध्ये दिलेल्या निदेशानुसार श्री.ऋषिकेश गजानन अरणकल्ले यांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याच्या अर्जावर सुनावणी घेवून निर्णय घेण्याबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २६ ऑगस्ट, २०२३

वाचा-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.१४ डिसेंबर, २०२२
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.३१ जानेवारी, २०२३
२. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०१७५/२०२१३ मधील दि.२४/८/२०२३चे आदेश
३. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या दिनांक २५/८/२०२३ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना -

श्री.ऋषीकेश अरणकल्ले यांनी मल्लखांब या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ या तीन वर्षांतील पुरस्कारासाठी अर्ज सादर केला होता. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने श्री.अरणकल्ले यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्ताऐवजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित केलेल्या अटीची पुर्तता होत नसल्याने त्यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते. शासनाच्या या निर्णयाविरोधात श्री.अरणकल्ले यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१०१७५/२०२३ दाखल केली होती. सदर याचिकेबाबत दिनांक २४/०८/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने श्री.अरणकल्ले यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबत विहीत शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून पुनर्विचार करावा असे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्री.अरणकल्ले यांच्या प्रकरणी निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ-३" मधील नियम क्र. ६ मधील क्र. ६.१ नुसार पुरस्कार वर्षापासून लगतपूर्व ५ वर्षामध्ये कोणत्याही तीन वर्षात संबंधित खेळाडूने अधिकृत संघातर्फे संबंधित खेळाच्या अधिकृत राष्ट्रीय फेडरेशनमार्फत आयोजित वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक संघाकडून सहभागी होवून किमान एक पदक (प्राविण्य) संपादन केले आहे, अशा खेळाडूंचा गुणांकनाकरीता विचार करण्यात येईल. एकाच वर्षामध्ये वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) आयोजित झालेल्या असतील तर त्या दोन स्वतंत्र राष्ट्रीय स्पर्धा गणण्यात येतील अशी तरतूद आहे.

२. श्री.अरणकल्ले यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की ते सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या तीनही वर्षांकरीता सादर केलेल्या पुरस्कार अर्जामध्ये तीन वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झालेले नसल्याने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरीता त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते.

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०८/२०२३ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) आयोजित केलेल्या बैठकीमध्ये श्री.अरणकल्ले यांनी ते सन २०२०-२१ या वर्षाच्या पुरस्काराकरीता सादर केलेल्या अर्जासोबत तीन वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झाल्याचा दावा केलेला आहे. या तीन स्पर्धांपैकी एक स्पर्धा ही दि.२५ ते २९ सप्टेंबर २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. श्री.अरणकल्ले यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेसोबत केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयाने दि.०६/०४/२०२१ रोजीचे पत्र सादर केले आहे. या पत्रानुसार कोविडमुळे सन २०२० या वर्षात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन झाले नसल्यास संबंधित क्रीडा प्रकाराच्या राष्ट्रीय संघटनेने माहे सप्टेंबर २०२१ पर्यंत सन २०२० मधील राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यास परवानगी प्रदान केलेली आहे. श्री.अरणकल्ले यांनी सहभाग घेतलेली दि.२५ ते २९ सप्टेंबर २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली स्पर्धा ही सन २०२० मधील स्पर्धा आहे.

४. केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयाचे दि.०६/०४/२०२१ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झालेले नव्हते. तसेच श्री.अरणकल्ले यांनी त्यांच्या अर्जासोबत सदर पत्राची प्रत जोडलेली नव्हती. त्यामुळे श्री.अरणकल्ले यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करताना सन २०२० मध्ये आयोजित केलेल्या स्पर्धेचा कालावधी हा पुरस्कार वर्षात विहित करून देण्यात आलेल्या कालावधीच्या मुदतीबाहेरचा असल्याने या प्रमाणपत्रास गुणांकन करण्यात आलेले नव्हते. केंद्र शासनाच्या पत्रानुसार दि.२५ ते २९ सप्टेंबर २०२१ या कालावधीत आयोजित सन २०२० ची राष्ट्रीय स्पर्धा सन २०२०-२१ च्या पुरस्कारासाठी गुणांकन करताना ग्राह्य धरून श्री.ऋषिकेश अरणकल्ले यांचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरिता विचार करणे आवश्यक आहे. सदर स्पर्धेतील सहभाग

विचारात घेतला असता श्री.अरणकल्ले यांचे गुणांकन २६ असे होते. तसेच, श्री.अरणकल्ले हे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी इतर आवश्यक सर्व निकष पूर्ण करतात. सन २०२०-२१ या वर्षात मल्लखांब या क्रीडा प्रकाराकरीता पुरूष संवर्गात कोणत्याही खेळाडूस पुरस्कार देण्यात आलेला नाही. उक्त पार्श्वभूमी विचारात घेता, सन २०२०-२१ या वर्षाच्या मल्लखांब या क्रीडा प्रकारासाठी श्री.अरणकल्ले हे पात्र ठरत असल्याने त्यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

५. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी श्री.अरणकल्ले यांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यासाठीची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ज्ञानेश्वर आव्हाड)**
कार्यासन अधिकारीमहाराष्ट्र शासन ,

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२) मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे खाजगी सचिव

३) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,

४) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

५) संबंधित विभागीय उप संचालक,

६) संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी,

७) श्री.ऋषिकेश गजानन अरणकल्ले (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),

८) सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ,

९) निवडनस्ती क्रीयुसे-२